**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १६०/२०२०**

**सुधिर रामराव माने वि. राम नारायण माने**

MHLA130011302020

**<u>निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश</u>**

**<u>आदेश पारीत दिनांक २९/११/२०२४</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुत दाव्याचा निकाल होईपर्यंत दावा मिळकतीवर त्यांच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्रं १, ३ ते ५ यांनी जवाबदावा निशाणी क्र.२० वर दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्रं २ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्रं ६ व ७ हे दाव्यात हजर होवुनही त्यांनी म्हणणे सादर केले नाही, त्यांच्या विरुध्द 'विना जबाबदावा' आदेश पारीत करण्यात आला.

**<u>अर्जदार/ वादीचे थोडक्यात म्हणणे असे आहे की...</u>**

(२) वादी हा प्रतिवादी क्रं १ व २ चा मुलगा आहे. प्रतिवादी क्रं २ ही वादीची सावत्र आई आहे. प्रतिवादी क्रं ३ ही वादीची सख्खी आई आहे. प्रतिवादी क्रं ४ व ५ हे वादीचे सावत्र भाऊ आहेत. तर प्रतिवादी क्रं ६ व ७ हे बेकायदेशीर खरेदीदार आहेत.

प्रतिवादी क्रं. १ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रं.१७० मधील क्षेत्र ० हे ०९ आर जमीन ज्याच्या चतु:सिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः विष्णु पडिले यांची जमीन.

पश्चिमेसः रंगराव माने यांची जमीन.

दक्षिणेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

उत्तरेसः विश्वनाथ माने यांची जमीन.

प्रतिवादी क्रं.१ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रमांक १७२ मधील क्षेत्र ० हे. २१ आर जमीन ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः रस्ता.

पश्चिमेसः माणिकराव पाटी यांची जमीन.

दक्षिणेसः राम कुंभार यांची जमीन.

उत्तरेसः हानमंत गाडे यांची जमीन.

प्रतिवादी क्रं.१ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रं. २८ मधील क्षेत्र ०१ हे. ३९ आर जमीन ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः बाबु ग्याना वलमपल्ले याची जमीन

पश्चिमेसः मोहन निवृत्ती कनसे यांची जमीन.

दक्षिणेसः निवृत्ती किशन वलमपल्ले यांची जमीन.

उत्तरेसः राम संग्राम यांची जमीन.

प्रतिवादी क्रं ०१ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्र. ४५ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर जमीन ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः विष्णु पडिले यांची जमीन,

पश्चिमेसः रंगराव माने यांची जमीन.

दक्षिणेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

उत्तरेसः विश्वनाथ माने यांची जमीन.

प्रतिवादी क्रं.४ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रं.४१ मधील क्षेत्र ० हे. २० आर जमीन ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

पश्चिमेसः रंगराव माने यांची जमीन.

दक्षिणेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

उत्तरेसः राम माने यांची जमीन.

प्रतिवादी क्रं.६ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रं. २८ मधील क्षेत्र ० हे. २० आर जमीन ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

पश्चिमेसः रंगराव माने यांची जमीन.

दक्षिणेसः ज्ञानोबा उगिले यांची जमीन.

उत्तरेसः राम माने यांची जमीन.

प्रतिवादी क्रं.७ यांच्या नावे असलेल्या मौजे तळणी येथील जमीन गट क्रं.४१ मधील क्षेत्र ० हे. २० आर जमीन ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणेः

पुर्वेसः तुकाराम निवृत्ती कनसे

पश्चिमेसः राम नारायण माने यांची जमीन.

दक्षिणेसः निवृत्ती किशन वलमपल्ले यांची जमीन.

उत्तरेसः राम संग्राम उगिले यांची जमीन.

वर नमुद मिळकती हया दाव्याचा वाद विषय आहे. (यापुढे सदर मिळकतीचा 'दावा मिळकत' असा उल्लेख) वादीने कथन केले आहे की, सदर वाद मिळकत ही वादी यांची वडीलोपार्जीत जमीन आहे.

(३) त्यामुळे सर्व दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत एकत्र कुटुंबाच्या मिळकती असुन त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचा हिस्सा आहे. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.१ चे नाव असल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्रं. २ व ३ यांच्याशी संगणमत करुन दावा मिळकतीवर त्रयस्त व्यक्तीचे विभाजनाद्वाने हक्क निर्माण करण्याचा प्रयत्न करुन वादींचा दावा मिळकतीतील कायदेशीर अधिकार डावलण्याचा प्रयत्न करीत आहेत. दिनांक १२/१२/२०२२ रोजी वादींचा दावा मिळकतीवरील हिस्सा प्रतिवादींनी नाकारला, त्यामुळे सदरचा दावा दाखल करण्यात आला असुन वादी यांनी प्रतिवादी यांना सदर दाव्याचा निकाल अंतिम गुणदोषांवर होईपर्यंत दावा मिळकती (दाव्याच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद  मिळकती) कोणत्याही प्रकारे त्रयस्त व्यक्तीस हस्तांतर अथवा विक्री करु नये अगर अन्य कोणत्याही मार्गाने तबदील करु नये, अशी तुर्तातूर्त ताकीद देण्यात यावी, हि विनंती केली आहे.

(४) प्रतिवादी क्रं. १,३ ते ५ यांनी निशाणी क्र.२० नुसार जवाबदावा दाखल करुन प्रस्तुत अर्जातील सर्व कथने सपशेल नाकारली आहेत. प्रतिवादींनी असे कथन केले की, प्रस्तुत अर्ज अथवा दावा करण्यास कोणतेही कारण घडले नाही. प्रतिवादींनी वादींना दावा मिळकतीत कधीही हरकत अडथळा अथवा अतिक्रमण केले नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांच्या जमीनीच्या दक्षिण बाजुस वहीवाटीसाठी सरकारी रस्ता असल्याने व प्रतिवादीच्या जमीनीचा रस्ता असल्याने काही एक सबंध नसल्याचे नमुद केले आहे. सबब अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

(५) पुढील बाबी माझे विचारार्थ उपस्थित होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.–

| विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. वादींच्या बाजूने प्रथम दर्शनी दावा आहे काय ? | **होय.** |
| २. दाव्याचा तूळ/कल वादींकडे आहे काय ? | **होय.** |
| ३. तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | **होय.** |
| ४. आदेश काय ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

**–: का र ण मि मां सा :–**

(६) वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्राचे अवलोकन केले.

**विचारार्थ बाब क्र. १ ते ३ :–**

(७) वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटणी करुण प्रत्यक्ष ताबा मिळणे बाबत व कायमचा मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे वादीचे वडील व आई असुन प्रतिवादी क्र.३ ही वादीची सावत्र आई आहे, तर प्रतिवादी क्र. ४ आणि ५ हे वादीचे सावत्र भावंडे आहेत. प्रतिवादी क्र.६ व ७ हे दावा मिळकतीचे खरेदीदार आहेत.

(८) दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जीत अविभक्त कुटुंबाच्या मिळकती असुन प्रतिवादी क्र. १, ४, ६ व ७ यांच्या नावे आहे. वादीने प्रतिवादी क्र. १ हे त्यांचे वडील असुन, त्यांचा वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी वादीसोबतचे नातेसंबध नाकारुन वाद मिळकतीशी वादीचा कसलाही संबध नसल्याचे कथन केले आहे.

(९) अभिलेखावर दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १,४ व ६ आणि ७ यांच्या नावे असल्याचे दिसुन येते. वादीने दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ यांना वाटणीद्वारे मिळाल्याचे कथन केले आहे. तसेच वाद मिळकतीपैकी काही मिळकती हया वडीलोपार्जीत मिळकतीच्या उत्पन्नातुन प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ च्या नावे खरेदी घेतल्याचे कथन केले आहे. तसेच वाद मिळकतीपैकी काही मिळकत प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ४ यांनी कुटुंबातील कोणाचीही संमत्ती न घेता कोणत्याही कायदेशीर गरजेपोटी शेतजमीन विक्री केली नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ व ४ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती असल्याचे कथन केले आहे.

(१०) वादीच्या कथनाप्रमाणे वादी हा दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ चा मुलगा असल्याने त्याचा वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये अर्धा हिस्सा आहे. तर प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ व ४ यांच्या स्वकष्टार्जीत मिळकती आहेत. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या सख्ख्या भावांच्या नावाने मिळकती खरेदी केलेल्या होत्या व नंतर सदरच्या स्वकष्टार्जीत मिळकती अपापसात वाटणी करुण घेतल्या. त्यामुळे वादीला वाटणी मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही.

(११) वादीने दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या वडीलोपार्जीत मिळकती असल्याचे कथन करुन सदर कथनाच्या पुष्टयार्थ नि.क्रं. ०४ खाली कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे गट क्र. १७०, १७२, १२८ व ४५ मध्ये मिळकत असल्याचे दिसुन येते. तसेच वादीने फेरफार क्र. ९६७ ची सत्य प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर फेरफारवरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १ व त्यांचे भाऊ दामु नारायण माने व त्र्यंबक नारायण माने यांनी वाटणीपत्र क्र. बी.व्ही.६७००२९ दिनांक २४/११/२००९ च्या आधारे मिळकतीची वाटणी करुन घेतलेली आहे. सदर फेरफारवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ व त्यांचे बंधु त्र्यंबक नारायण माने यांना गट क्र. १७० व १७२ मध्ये अनुक्रमे ०९ आर व २१ आर प्रत्येकी

जमीन वाटणीस आलेली आहे.

**(१२)** फेरफार क्र.९६७ ची नोंद वाटणीपत्राआधारे घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच प्रतिवादींनी वादी हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा असल्याचे व प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र.१ ची पत्नी असल्याचे नाकारले असले तरी प्रतिवादींनी त्यांच्या जबाबदाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ हिची प्रवृर्ती व्यवस्थीत नसल्याने ती पत्नी म्हणुन केव्हाही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी झालेली नाही अथवा पत्नी म्हणुन प्रतिवादी क्र. १ सोबत केव्हाही व्यवस्थीत रित्या राहीलेली नाही, असे कथन केले आहे. प्रतिवादीनीं प्रतिवादी क्र. २ सोबत प्रतिवादी क्र. १ चे वैवाहिक नाते स्पष्टपणे नाकारल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. वर नमुद जबाबदाव्यातील कथनाप्रमाणे प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. २ ही प्रतिवादी क्र. १ कडे व्यवस्थीत राहीली नाही हे मान्य केले आहे. त्यामुळे वादी हा प्रतिवादी क्र. १ व २ चा मुलगा नाही ही बाब प्रथम दर्शनी खोटी ठरते.

**(१३ )** अभिलेखावर दाखल कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ च्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत. प्रतिवादी क्र. १ व ४ ने दावा मिळकती हया त्यांच्या स्वकष्टार्जीत असले बाबत कोणताही सुसंगत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणला नाही. तसेच, प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी दावा मिळकती खरेदी घेतले बाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. त्यामुळे दावा मिळकती हया प्रतिवादी क्र.१ च्या वडीलोपार्जीत मिळकती आहेत असे मानण्यास प्रथमदर्शनी अधिक वाव आहे.

**(१४ )** वरील सर्व बाबी विचारात घेता, प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादी हा प्रतिवादी क्र. १ व २ यांचा मुलगा आहे. तसेच, दावा मिळकती हया प्रतिवादी क्र. १ यांच्या वडीलोपार्जीत मिळकती आहे. त्यामुळे, वादीचा प्रतिवादी क्र.१ च्या वडीलोपार्जीत जमीनीमध्ये कायदयाप्रमाणे हक्क व अधिकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. या सर्व कारणामुळे वादीचा दावा प्रथमदर्शनी दिसुन येतो व त्यामुळे न्यायाचा तराजु वादीच्या बाजुने झुकतो. म्हणून प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपर्यत वादीने विनंती केल्याप्रमाणे प्रतिवादींच्या विरुध्द वादींच्या हक्कात तुर्तातूर्त ताकीदीचा

आदेश पारीत करणे न्यायोचित होईल. सबब, मी विचारार्थ बाब क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवीत आहे.

**विचारार्थ बाब क्र. ४ :–**

**(१५)** वरील कारणमिमांसा लक्षात घेऊन न्यायोचित होईल असा खालील आदेश पारीत करीत आहे.–

**–: आ दे श :–**

१) वादीचा निशाणी क्र.०५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जातील नमुद दावा मिळकतींचे प्रतिवादींनी कोणत्याही प्रकारे हस्तांतरण, विक्री अथवा बदल दाव्याचा निकाल लागेपर्यंत करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येतो.

३) अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)

स्वाक्षरीत/–

( के.के.वाघमारे )

दिनांक : २९.११.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रेणापूर